**ठळक बातम्या**

- गुड फ्रायडे निमित्त ख्रिस्ती धर्मीयांकडून येशू ख्रिस्ताचं स्मरण, देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन
- जम्मू आणि काश्मिरमधल्या दहशतवादी कारवायांना तोंड देण्यासाठी केंद्रीय राखीव पोलिस दलाकडून विशेष कोब्रा बटालियनची स्थापना
- संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आज महाराष्ट्रात, छत्रपती संभाजीनगरच्या दौऱ्यावर
- जेईई मुख्य परीक्षेचा निकाल उद्या जाहीर होणार

**आणि**

- स्क्वॉश जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या वीर चोत्रानी याचा उपांत्य फेरीत प्रवेश

**<><><><><>**

जगभरातले ख्रिश्चन धर्मीय आज गुड फ्रायडे निमित्त श्रद्धेनं आणि बंधुत्वाच्या भावनेनं प्रभु येशुचे स्मरण करत आहेत. प्रभू येशूला आजच्या दिवशी सुळावर चढवल्याचं मानलं जातं. या निमित्तानं विविध ठिकाणच्या चर्चमधून विशेष प्रार्थनेसह अनेक धार्मिक कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे.
प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गुड फ्रायडे निमित्त प्रभू येशुच्या बलिदानाचं स्मरण केलं आहे. हा दिवस आपल्याला प्रेम, सहानुभूती, दयाळूपणा आणि करुणेची प्रेरणा देत असल्याचं प्रधानमंत्री मोदी यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या भाषणांवर आधारीत **संस्कृति का पांचवां अध्याय** या पुस्तकाचं प्रकाशन आज नवी दिल्लीत होणार आहे. या पुस्तकाचं प्रकाशन जुना आखाड्याचे प्रमुख आचार्य महामंडलेश्वर पूज्य स्वामी अवधेशानंद गिरी महाराज

यांच्या हस्ते केलं जाणार आहे. राम बहादूर यांनी पुस्तकाची प्रस्तावना लिहिली असून भाषणांचं संकलन डॉक्टर प्रभात ओझा यांनी केलं आहे. या पुस्तकात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी संस्कृती, परंपरा, अध्यात्मिक मूल्य आणि संस्कृतिक वारसा या विषयांवर दिलेल्या भाषणांचं संकलन करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

युनेस्कोच्या **मेमरी ऑफ द वर्ल्ड रजिस्टर**मध्ये गीता आणि नाट्यशास्त्राचा समावेश केल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आनंद व्यक्त केला आहे. गीता आणि नाट्यशास्त्राने शतकानुशतके संस्कृती आणि चेतना जोपासली असून त्यांचा समावेशामुळे जगाला प्रेरणा मिळेल असं त्यांनी समाजमाध्यमावर एका पोस्ट मध्ये म्हटलं आहे.

**<><><><><>**

आज जागतिक वारसा दिन आहे. दरवर्षी १८ एप्रिल रोजी हा दिवस सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारशाचा सन्मान आणि संरक्षण करण्यासाठी साजरा केला जातो. **'आपत्ती आणि संघर्षांमुळे धोक्यात आलेला वारसा'** ही या वर्षीच्या वारसा दिनाची संकल्पना आहे.

गेल्या काही वर्षांत, जागतिक वारसास्थळांच्या यादीत भारतातल्या स्थळांनी स्थान पटकावलं आहे. जागतिक वारसा यादीत सध्या भारतातली ४३ स्थळं आहेत. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने आजच्या जागतिक वारसा दिनानिमित्त देशभरातल्या सर्व ASI-संरक्षित स्मारकांमध्ये मोफत प्रवेश जाहीर केला आहे.

**<><><><><>**

जम्मू आणि काश्मिरमधल्या दहशतवादी कारवायांना तोंड देण्यासाठी केंद्रीय राखीव पोलिस दलानं विशेष कोब्रा बटालियनची स्थापना करण्याची घोषणा केली आहे. नक्षलग्रस्त राज्यांमध्ये घनदाट जंगलात लढण्यासाठी १७ वर्षांपूर्वी, निमलष्करी दल म्हणून कोब्रा बटालियनची स्थापना करण्यात आली.

मध्य प्रदेशात नीमच जिल्ह्यात काल दलाच्या ८६व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सीआरपीएफचे महासंचालक ज्ञानेंद्र प्रताप सिंह यांनी ही घोषणा केली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या निर्देशानुसार नवीन कोब्रा पथक तयार केल्याचं त्यांनी सांगितलं. या नवीन बटालियनमुळे जम्मू आणि काश्मीरमध्ये केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या कारवाया अधिक मजबूत होतील आणि वनक्षेत्रात दहशतवादी कारवायांचा सामना करण्यासाठी मदत होईल. हे नवीन पथक ११ वी कोब्रा बटालियन असेल.

<><><><><>

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह हे आज छत्रपती संभाजीनगरच्या दौऱ्यावर येत आहेत. दुपारी साडेचार वाजता त्यांचं आगमन होणार असून संध्याकाळी पाच वाजता ते महाराणा प्रताप यांच्या पुतळ्याच्या अनावरण सोहळ्याला उपस्थित राहतील. त्यानंतर सहा वाजता ते उद्योजकांशी संवाद साधणार आहेत.

<><><><><>

भारतातील फ्रान्सचे राजदूत डॉ. थिएरी मॅथ्यू यांनी अमृतसरमधील सचखंड श्री हरमंदिर साहिब इथं भेट दिली. तेथे त्यांनी गुरबानी कीर्तन ऐकलं आणि श्री गुरू रामदास जी सराई इथल्या सामुदायिक ‘रसोई’लाही भेट दिली. तिथं दररोज सुमारे एक लाख लोकांना लंगर दिला जातो हे पाहून मॅथ्यू खूप प्रभावित झाले. पवित्र सुवर्ण मंदिराला भेट दिल्यावरही अशाच प्रकारची आध्यात्मिकता अनुभवायला मिळाल्याचं मॅथ्यू यांनी सांगितलं.

<><><><><>

जेईई मुख्य परिक्षेचा निकाल उद्या जाहीर होणार आहे. जेईई मेन २०२५ सत्र २ च्या अंतिम उत्तरपत्रिका आज दुपारी २ वाजेपर्यंत जेईई मेन वेबसाइटवर डाउनलोड करण्यासाठी उपलब्ध असतील असं राष्ट्रीय चाचणी संस्थेनं एका निवेदनात म्हटलं आहे.

<><><><><>

मलेशियात क्वालालंपूर इथे झालेल्या स्क्वॉश जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या वीर चोत्रानी याने उपांत्य फेरीत प्रवेश केला. त्याने मलेशियाच्या सैफिक कमाल याचा ९-११, ११-६, ११-६, ११-७ असा पराभव केला. या स्पर्धेच्या महिला एकेरी प्रकारात मात्र भारताच्या तन्वी खन्ना हिला उपांत्यपूर्व फेरीत हाँगकाँगच्या हेलेन तांगकडून पराभव पत्करावा लागला.

<><><><><>

सौदी अरेबियात दम्मम इथं झालेल्या आशियाई युवा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये १८ वर्षांखालील महिलांच्या १०० मीटर अडथळा शर्यतीत भारताच्या शौर्या अंबुरेहेनं कांस्यपदक जिंकले. १५ वर्षीय शौर्याने १३.८ सेकंद वेळेसह पदक जिंकले. गेल्या दोन दिवसांत तिची ही सलग दुसरी सर्वोत्तम कामगिरी आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि पंजाब किंग्स यांच्यात लढत होणार आहे. बंगळुरुच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता सामना होईल.

काल झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सनं सनरायर्जस हैदराबादवर चार गडी राखून विजय मिळवला. मुंबई इंडियन्सचा संघ सध्या गुणतालिकेत सातव्या स्थानावर आहे.

<><><><><>

कोलकाता उच्च न्यायालयानं वक्फ संशोधक कायद्याच्या विरोधात झालेल्या मुर्शिदाबाद हिंसाचाराची राष्ट्रीय तपास संस्थेमार्फत चौकशी करण्याची मागणी करणारी याचिका फेटाळली. पश्चिम बंगाल विधानसभेतले विरोधी पक्ष नेते शुभेंदु अधिकारी आणि अन्य नेत्यांनी ही मागणी केली होती. मुर्शिदाबाद जिल्ह्यात तणाव

असलेल्या भागांत केंद्रीय सुरक्षा बल तैनात करण्याचे आदेशही न्यायमूर्ती सौमेन सेन आणि न्यायमूर्ती राजा बसु चौधरी यांच्या खंडपीठानं दिले आहेत.

**<><><><><>**

पश्चिम बंगालमधल्या घडामोडींवरच्या बांगलादेश अधिकाऱ्यांच्या टिप्पण्या भारताने फेटाळून लावल्या आहेत. पश्चिम बंगालमधील घडामोडींवरील बांगलादेशने अनुचित टिप्पण्या करण्याऐवजी त्यांच्या देशातल्या अल्पसंख्याकांच्या हक्कांचे रक्षण करण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. बांगलादेशात अल्पसंख्याकांवर अत्याचार करणारे गुन्हेगार अजूनही मोकाट फिरत आहेत, अशा शब्दांत परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी बांगलादेशला फटकारले आहे.

**<><><><><>**

इस्त्रायलच्या युद्ध विरामाचा प्रस्ताव हमासनं फेटाळून लावल्यानं दोघांमधी चर्चा थांबली आहे. इस्त्रायलच्या अटकेत असलेल्या सर्व युद्धबंदीची मुक्तता करत त्याबदल्यात पॅलेस्टाईन नागरिकांची मुक्तता करण्याची तयारी हमासनं दर्शवली आहे. ४५ दिवसांचा युद्धविराम आणि १० कैद्यांची मुक्तता करण्याचा प्रस्ताव इस्त्रायलनं हमासपुढे ठेवला होता. याआधीही इस्त्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतन्याहू यांनी दिलेला प्रस्तावरही हमासनं फेटाळून लावला. इस्त्रायलला तडजोड नको असून ते केवळ राजकीय अजेंडा राबवत असल्याचा आरोप हमासनं केला आहे.

**<><><><><>**

येमेनच्या पश्चिमकडच्या होदेदाह प्रांतातल्या एका तेल सुविधा केंद्रावर काल अमेरिकेनं केलेल्या हवाई हल्ला केला. या हल्ल्यात किमान ३८ कर्मचारी ठार तर १०० हून अधिक जखमी झालेत. हुथींच्या उत्पन्नाचे स्त्रोत विस्कळीत करणं हा या हल्ल्याचा हेतू असल्याचं अमेरिकेच्या सेंट्रल कमांडनं सांगितलं.

**<><><><><>**

संरक्षण सचिव राजेश कुमार सिंग हे आपला दोन दिवसीय लंडनाचा दौरा आटपून काल भारतात परतले. या दौऱ्यादरम्यान काल त्यांनी यूके आणि भारत व्यवसाय परिषदेनं आयोजित केलेल्या भारत-यूके संरक्षण उद्योग गोलमेज परिषदेला त्यांनी संबोधित केलं.  यावेळी त्यांनी नौदल प्रणाली, ड्रोन, देखरेख, संरक्षण क्षेत्रातील अवकाश आणि विमान वाहतूक यासारख्या प्रमुख संरक्षण क्षेत्रांमध्ये भारतीय स्टार्ट-अप्सच्या वाढत्या क्षमतांवर प्रकाश टाकला.

**<><><><><>**

भारतीय हवामान विभागानं आज राजस्थानमध्ये उष्णतेची लाट येणार असल्याचा अंदाज वर्तवला आहे.तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात येत्या दोन ते तीन दिवसांत हवामान उष्ण आणि दमट राहण्याचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**